MHAU090023482017

**नि.दि.दा.क्र.१८९/२०१७**
**सिंधुबाई वि. कुंडलिक व इतर**

## निशाणी क्र.४० वर आदेश

अर्ज व खुलाशाचे अवलोकन केले. तसेच युक्तीवाद ऐकला.

**अर्ज**

२. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी न्यायालयीन आयुक्त म्हणुन, उप–अधीक्षक भुमी अभीलेख कार्यालय पैठण, यांची नेमणुक करावी., तसेच त्यांनी मोजणी करुन, हद्दी खुणा कायम करुन, अहवाल मा. न्यायालयात सादर करण्याबाबत दाखल केला आहे. वादी यांचे थोडक्यात कथन की, दावा जाहीर घोषीत होवुन मिळण्याकरीता व ताबा मिळण्याकरीता, निरंतर मनाई हुकुमाकरीता दाखल केला आहे. दि.०५.०७.२००२ रोजी प्रतिवादी क्र.१ कुंडलिक व विठ्ठल यांच्यात आपसात संमती आधारे, भाऊ हिस्सा आठ आणे प्रमाणे, विठ्ठल यांना कमी हिस्सा क्षेत्र येत असल्याने, त्यांनी ५० आर क्षेत्र राजीखुशीने विठ्ठल चिंतामण वाकडे यांच्या हक्कात दिला आहे. विठ्ठल वाकडे यांनी दि.०३.०६.२००३ रोजी त्यांची बहिण सिंधुबाई, वादी हिला फेरफार क्र.३१३८ वाटपा आधारे दिली. तेव्हापासुन ती मालकी हक्कात आहे.

३. वादी ही वयोवृध्द आहे. तिचे मुले बाहेरगावी राहतात. या गोष्टीचा प्रतिवादी यांनी गैरफायदा घेतला. वादीच्या मिळकतीवर पश्चिमेकडील दिशेने उत्तर–दक्षिण बांध नाहिसा केला. ५० आर क्षेत्र अतिक्रमण केले. म्हणुन दावा दाखल केला. जमीन गट क्र.२४८/१ या गटाची मोजणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे कायस्वरुपी अतिक्रमणाबाबत वाद निकाली लागु शकतो. किती क्षेत्र अतिक्रमण केले हे स्पष्ट होईल. सबब, अर्ज मंजुर करावा, अशी त्यांनी विनंती केली.

**<u>खुलासा</u>**

**४.** प्रतिवादी यांनी नि.क्र.५८ अन्वये खुलासा दाखल केला. अर्जास आक्षेप घेतला. अर्जातील सर्व कथन विवेक्षीतपणे नाकारले. दावा मिळकत वादी यांच्या ताब्यात व मालकीत नाही. त्यामुळे दुसऱ्याला बटाईने दिली याचा प्रश्नच येत नाही. वादी ही मुख्त्यारची बहिण आहे. ती धडधाकट आहे. मुख्त्यार हा राजकारणी आहे. त्याला न्यायालयात साक्ष देण्याचा अनुभव आहे. यापुर्वी, प्रतिवादी क्र.१ च्या मुलाने जनरल मुख्त्यार विठ्ठल, यांचे जावई विरुध्द न्यायालयात मुकदमा क्र.१०/२०१० दाखल केला होता. याचा राग धरुन मुख्त्यार याने बहिण वादी, हिचे नाव पुढे करुन खोटा दावा दाखल केला आहे. वादीचा भाऊ जनरल मुख्त्यार याने प्रतिवादी क्र.१ च्या नावाने गट क्र.२४८ हा अस्तित्वात नसतांना त्याचे खोटे संमतीपत्र बनविले, तलाठ्याशी संगणमताने स्वत:च्या नावे नोंद करुन घेतली. कथन हे न्यायालयाचे दिशाभुल करणारे आहे. दि.२९.११.२००७ रोजी वादी यांनी दावा मिळकती संदर्भात मोजणी अर्ज दिल्यामुळे, प्रत्यक्ष मोक्यावर जावुन उप–अधिक्षक भुमी अभिलेख पैठण यांनी पंचनामा केला. त्यामध्ये वादीचा ताबा नाही, असे नमुद केले ही बाब वादीने नमुद केली नाही. पुरावे गोळा करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्ज कायदेशीर नसल्याने खारीज करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

**५.** परस्पर विरोधी कथन व युक्तीवाद अन्वये, खालीलप्रमाणे मुद्दे माझे समक्ष उपस्थित होतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | विनंती केल्याप्रमाणे न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करण्यात यावी का ? | नाही |
| २ | काय आदेश ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

६. युक्तीवाद ऐकून घेऊन दाव्याचे अवलोकन केले. उभयपक्षाने सखोल व विस्तृत असा युक्तीवाद केला. याव्यतिरिक्त वादी यांनी खालील न्यायनिवाड्यावर भिस्त ठेवली.

*Mayuresh Subhash Sonawane Vs. Yashwant Babu Bhoir and Orthers, Bombay High Court [2022(1) B C J 33]*

प्रतिवादी यांनी खालील न्यायनिवाड्यावर त्यांची भिस्त ठेवली.

*Dhondiram Nivrutti Pawar Vs. Laxman Khashaba Pawar, [2018(2) Mh.L.J] 255,*

*Sanjay Thorat Vs. Ramchandra Thorat, [2018(2) Mh.L.J.]954*

७. दावा हा जाहिर घोषीत होऊन मिळण्याकरीता, अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळण्याकरीता, निरंतरच्या मनाई हुकुमकरीता व दरम्यानच्या उत्पन्नाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी कैफीयत दाखल केल्याचे दिसते. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक होण्यासाठी दाखल केला आहे.

८. मार्च,२०२० पासून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

९. न्यायालयीन आयुक्त यांना दिवाणी प्रक्रीया संहितेचे आदेश २६ नियम ९ अन्वये त्यांची नेमणुक केली जाऊ शकते. तसेच त्या अन्वये कशासाठी नेमणुक करावी हे देखील नमुद आहे. दावा हा जाहिर घोषीत होऊन मिळण्याकरीता, अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळण्याकरीता, निरंतरच्या मनाई हुकुमकरीता व दरम्यानच्या उत्पन्नाकरीता

दाखल केला आहे. वादी यांनी त्यांच्या ताब्यात मिळकत कशी आली, हे कथन केले आहे. फेरफार क्र.३१३८ अन्वये, विठ्ठल वाकडे यांनी दि.०२.०६.२००३ रोजी मिळकत ही, वादी यांच्या ताब्यात मिळकत दिली. ती मिळकत ही वाटणी आधारे दिली. महत्वाचे म्हणजे विठ्ठल वाकडे हे वादी यांचे जनरल मुख्त्यार आहे. म्हणजे मुख्त्यार यांनी मिळकत ही वादी यांना दिली, असे वादी यांचे कथन आहे. त्याबाबतचा फेरफार अभिलेखावर दाखल आहे. हिच बाब वादी यांनी जाहिर घोषीत होऊन मिळण्यासाठी विनंती केल्याचे दिसते.

**१०.** परंतु प्रतिवादी क्र.२ ते ४ हे बटाईदारांना हरकत करतात, असे वादी यांचे कथन आहे. बटाईने दिल्यामागचे कारण, वादी ही वयोवृध्द आहे, तिचे मुले बाहेर गावी नोकरी निमित्त राहतात, असे नमुद आहे. थोडक्यात वादी यांचे कथन की, त्यांच्या ताब्यात मिळकत आहे. असे असतांना देखील, त्यांनी त्याच ५० आर क्षेत्राचा ताबा मागितलेला दिसतो. अर्जा मध्ये वादी यांनी असे नमुद केले की, पश्चिम दिशेकडे असलेला उत्तर दक्षिण बांध नष्ट करुन ५० आर, क्षेत्रावर ताबा केला. फेरफार क्र.३१३८ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये ५० आर जमीनच बहिणीला वाटुन दिली असे नमुद आहे. वादी यांचे कथन हे काही प्रमाणात संदिग्ध स्वरुपाचे आहे.

**११.** वादी यांनी Mayuresh Subhash Sonawane Vs. Yashwant Babu Bhoir and Orthers, Bombay High Court [2022(1) B C J 33] या न्यायनिवाड्यावर त्यांची भिस्त ठेवली. सदर न्यायनिवाड्याचे अवलोकन केले असता मा. न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २६ नियम ९ याबाबत विवेचन केले आहे. न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक ही अतिक्रमण किंवा अनुषंगिक मागणी साठी केली जावु शकते. परंतु पुरावा जमा/गोळा करण्यासाठी नाही, असे नमुद केले आहे.

**१२.** वादी यांचे हेच कथन की, त्यांना न्यायालयीन आयुक्तामार्फत हद्दीच्या

खुणा या कायम करावयाच्या आहे, म्हणुन योग्य न्यायदान होण्यासाठी व अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा घेण्यासाठी नेमणुक करणे आवश्यक आहे.

**१३.** प्रतिवादी यांनी Dhondiram Nivrutti Pawar Vs. Laxman Khashaba Pawar, [2018(2) Mh.L.J] 255, Sanjay Thorat Vs. Ramchandra Thorat, [2018(2) Mh.L.J.]954 या न्यायनिवाड्यावर त्यांची भिस्त ठेवली. सदर न्यायनिवाड्याचे अवलोकन केले असता, मा. न्यायालय यांनी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक पुरावे जमा करण्यासाठी होवु शकत नाही, याबाबत विवेचन केले आहे. वादी यांनी अर्जामध्येच नमुद केले आहे की, मिळकत त्यांच्या ताब्यात सन २००२ पासुन आहे. तसेच त्यांनी हे देखील नमुद केले आहे की, ५० आर क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे. मुळात वादी यांना ५० आर क्षेत्रच वाटणीने मिळाले, असे त्यांचे कथन आहे. त्यावरच अतिक्रमण झाले, हे देखील त्यांचे कथन आहे. वादींच्या ५० आर क्षेत्रावर अतिक्रमण झाले, ही बाब दाव्यात नमुद केल्याचे दिसुन येत नाही. वादी यांचा मुख्त्यार हे दावा प्रलंबित असतांना मयत झाले. त्यानंतर वादी हे स्वत: हजर होवुन कारवाई करत आहे, असे अभिलेखावरुन दिसुन येते.

**१४.** अतिक्रमण ५० आर क्षेत्राचे झाले, हे दाव्यात नमुद नाही, परंतु अर्जात नमुद आहे. वादी हे स्वत: ताब्यात आहे, असे कथन करीत आहे. त्यांनी ती जमीन बटाईने दिली आहे, असे देखील कथन करीत आहे. त्याच वेळी अतिक्रमण झाले, असे देखील कथन करीत आहे. ५० आर क्षेत्र वाटणीत मिळाले आहे, त्याच ५० आर क्षेत्रावर अतिक्रमण झाले, असे कथन केले आहे. कथन संदिग्ध स्वरुपाचे आहे. निश्चित बोध होत नाही. कदाचित पुरावा गोळा करण्याचा हा एक प्रयत्न असु शकतो, असे तुर्त तरी अभिलेखावरुन दिसुन येतो. पुरावा गोळा करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक केली जावु शकत नाही, हे न्यायालयाचे स्थापीत तत्व आहे. अर्ज कायदेशीर

नाही, असे मी माझे मत नोंदवितो. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:–

## आदेश

- नि.क्र.४० वरील अर्ज खारीज करण्यात येतो.
- आदेश खुल्या न्यायालयात पारीत करण्यात आला.

RAJU BHASKAR DOLE

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2026.08.17 17:33:45 +0530

(रा.भा.डोळे)

दिनांक :१७.०८.२०२६

४थे सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पैठण

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द-नि-शब्द हे मूळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : आर.एस. पुरी (लघुलेखक ग्रेड-३) |
| न्यायालयाचे नाव | : ४-थे न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पैठण. |
| आदेशाची तारीख | : १७.०८.२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : १७.०८.२०२६ |